अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# विद्यापीठाच्या हाताबाहेर जाणारे हातेकर प्रकरण

कोणत्या ना कोणत्या निमित्ताने वादग्रस्त राहण्याचा मान मुंबई विद्यापीठ मिळवत आले आहे. एकेकाळी अतिशय दिग्गजांच्या गुणवत्तेमुळे मुंबई विद्यापीठाला देशभरामध्ये अत्यंत मानाचे आणि प्रतिष्ठेचे स्थान होते. ज्याप्रमाणे एखाद्या घराण्याला मानसन्मान किंवा प्रतिष्ठा प्राप्त होते ती जपण्याची पात्रता त्याप्रमाणात नंतरच्या पिढीमध्ये दिसून येत नाही. तसे मुंबई विद्यापीठाचे झाले आहे. पूर्वसुरींच्या गुणवत्तेमुळे या विद्यापीठाला एक स्वतंत्र ओळख प्राप्त झाली होती. परंतु तो नावलौकिक टिकवण्यात मुंबई विद्यापीठाचे नंतरचे कुलगुरु अयशस्वी ठरले, असे म्हणणे भाग पडते. एखाद्या घराला घरपण लाभते त्या घरातल्या कर्तृत्ववान माणसामुळे आणि तिथल्याच संस्कारशील कुटुंबामुळे. पण जर का घरातला कर्ता माणूसच ठाकठीक नसेल तर त्या कुटुंबाची जशी धुळधाण होते तसे या मुंबई विद्यापीठाचे होत आहे. प्रामुख्याने गेल्या वीस वर्षामध्ये मुंबई विद्यापीठाला खऱ्या अर्थाने कर्तृत्ववान कुलगुरुच लाभले नाही आणि म्हणूनच हे विद्यापीठ सतत वादाच्या भोवऱ्यात गटांगळ्या खात राहिले. आतादेखील गेल्या वर्षभरापासून परीक्षांच्या वेळापत्रकांचा गोंधळ, पेपर फुटीचे अनेक प्रकार आणि प्राध्यापक हातेकर यांच्या निलंबनावरून निर्माण झालेले वादळ हे सगळे प्रकार विद्यापीठाचे प्रमुख असलेल्या कुलगुरुंच्या अकार्यक्षमतेचे परिणाम आहेत, असे म्हणणे भाग पडते. विद्यापीठातल्या चुकांबद्दल किंवा गोंधळाबद्दल एखादा प्राध्यापक जर स्पष्टपणे आपले मत मांडत असेल, त्या चुकांची कारणे सांगत असेल तर त्याचे स्वागत करण्याऐवजी त्या प्राध्यापकाला विद्यापीठाबाहेर हाकलण्याचा दुर्दैवी प्रकार कुलगुरुंनी केला. उलट हातेकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत कुलगुरुंनी चौकशीची तयारी ठेवायला हवी होती किंवा कारवाई करण्यापूर्वी हातेकर यांच्याशी चर्चा करायला हवी होती. यामधून कुलगुरुंचा प्रगल्भपणा दिसून आला असता आणि मुंबई विद्यापीठासारख्या नावलौकिक प्राप्त संस्थेचा प्रमुख व्यवहारामध्ये पारदर्शक आहे याचेही दर्शन घडू शकले असते. दुर्दैवाने तसे झाले नाही. आरोपांना उत्तर देण्याऐवजी ते मुद्दे मांडणाऱ्याला आरोपी केले गेले आणि निलंबित करुन निरुत्तरही करण्याचा प्रयत्न झाला. शिक्षणासारख्या क्षेत्रामध्ये सौजन्यशिलता आणि संवेदनशिलता अशा पध्दतीने हरवली जात असेल तर राजकारण किंवा अन्य ठिकाणी चालणाऱ्या गोंधळाबाबत फारसे बोलायला जागा उरत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या कारभाराला दीडशे वर्ष झाली आहेत.अनेक मोठमोठ्या व्यक्तींनी विद्यापीठाचे कुलगुरुपद भूषवले आहे ते स्वीकारताना त्या पदाच्या अभिमानापेक्षा आपल्यावर संस्थेचा नावलौकिक टिकवण्याची मोठी जबाबदारी आहे. याचे भान त्या मंडळींना राहात असे. प्रामुख्याने निदान त्या काळातले कुलगुरु तरी विद्यापीठाचे विश्वस्त म्हणूनच कार्य करीत असत आणि या विद्याविश्वामध्ये असणाऱ्या प्रत्येक घटकांमध्ये तसा विश्वासही निर्माण करीत असत. आज ही परिस्थिती राहिलेली नाही. विद्यापीठातल्या प्रत्येक घटकामध्ये अविश्वासाचे वातावरण दिसून येते. म्हणजे अगदी परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे होतील की नाही. इथपासून ते उत्तरपत्रिका नीट तपासल्या जातील की नाही इथपर्यंत. एवढेच नव्हे, तर कुलगुरु आणि प्रकुलगुरु किंवा कुलसचिव तसेच विद्यापीठातल्या अनेक विभागप्रमुखांमध्ये आपापसात विश्वासाचे किंवा सौहार्दाचे वातावरण नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येकजण आपल्याला मोठे पद कसे मिळवता येईल आणि मिळालेले पद कसे टिकवता येईल याचे डावपेच खेळण्यातच बराच वेळ घालवतो. कुलगुरुंच्या बाबतीतही तोच प्रकार पहायला मिळतो आहे. अनेक प्रकारचे गैरप्रकार गेल्या वर्षभरामध्ये झाले त्या संदर्भात विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना किंवा कर्मचाऱ्यांना विश्वासात घ्यावे, त्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून द्यावी आणि या समस्यांवर, अडचणींवर कशी मात करता येईल, याबद्दल सहकार्य करण्याचे आवाहन करावे, असे कुलगुरुंना कधीही वाटले नाही आणि मग ज्यावेळेला एखादा प्राध्यापक विद्यापीठाच्याच हितासाठी ज्या चांगल्या गोष्टी सांगण्याचा प्रयत्न करतो त्यावेळेला त्या पचनी पडणे कठीण जाते. कारण उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यापीठांमधल्या उच्च पदस्थांमध्येच ज्या उच्च दर्जाची संवेदनशिलता, सौजन्यशिलता लागते तीच राहिली नसल्यामुळे आपल्या विरोधातली कोणतीही गोष्ट सहन करण्याची तयारी राहात नाही. विद्यापीठ प्रशासनामध्ये आज शिक्षणापेक्षाही राजकारण जास्त खेळले जात आहे. विशेषत: विद्यापीठ नावाच्या संस्थानातले जेवढे काही फायदे आपल्याला उपटता येतील ते मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू असल्याचे चित्र पहायला मिळते. ज्या विद्यापीठाने विद्यार्थ्यांना एकूणच शैक्षणिक दिशा देण्याचे काम करायला हवे ते विद्यापीठ दिशाहीन झाल्याची दुर्दशा दिसत आहे.

## हात दाखवून अवलक्षण

हातेकर प्रकरण इतके हाताबाहेर जाईल, असे कुलगुरुंना वाटले नाही आणि आपण हात दाखवून अवलक्षण करून घेतल्याचे त्यांना जाणवले असेल. हाताबाहेर जाणाऱ्या विद्यापीठ कारभाराला चांगल्या गोष्टी सांगून हातभार लावण्याचा प्रयत्न हातेकरांनी केला तर त्यांनाच हद्दपार करण्याचे काम केले जावे. हे सहसा कोणालाही न पटण्यासारखेच होते. म्हणूनच आज कुलगुरुंच्या या भूमिकेविरुध्द अनेक प्राध्यापक संघटना आपला आवाज उठवत आहे. विद्यापीठ बंदची हाक देत आहेत. या सगळ्या वादाचे सावट कदाचित १२ जानेवारी रोजी होणाऱ्या दीक्षांत समारंभावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वी कुलगुरुंनी हे प्रकरण आवरते घेण्याचा प्रयत्न करावा व वैयक्तिक प्रतिष्ठेपेक्षा विद्यापीठ कुलगुरु हे पद या गोष्टीचा त्यांनी प्राधान्याने विचार केला पाहिजे. अर्थात काळाच्या ओघात कोणत्याच गोष्टीमध्ये निखळपणा राहिलेला नाही. बेगडीपणा प्रचंड प्रमाणात वाढला आहे हे विद्यापीठानेच अनेकवेळा मान्य केले आहे. शिक्षणाच्या मूल्यापेक्षा इतर गोष्टींनाच महत्त्व प्राप्त होत आहे. अगदी १२ तारखेच्या दीक्षांत समारोहातसुध्दा सचोटीने आणि कष्टाने सुवर्णपदक मिळवलेल्यांनासुध्दा निखळ सोन्याचे पदक हे विद्यापीठ देणार नाही तर त्यावर सोन्याचे पाणी फिरवून विद्यार्थ्यांच्या या शिक्षण मूल्यावर पाणी फिरवण्याचेच काम करणार आहे. या साध्या गोष्टीतूनही विद्यापीठाच्या कणाहीन प्रवृत्तीचे दर्शन घडते. सोने महाग आहे म्हणून ते देणे परवडत नाही, अशी कारणे विद्यापीठाने द्यावीत याच्यासारखे दरिद्रीपण दुसरे कोणते नाही. अशा कारभारावर कोणी हात उगारला तर कुलगुरुंना वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही.